**पोलीसांचे रेकॉर्डवरील घरफोडी चोरीतील महिला आरोपीने आपले साथीदाराचा सन २०१४ मध्ये तब्बल ३ वर्षापूर्वी इतर साथीदारांसह कट रचून खून करुन बॉडीची विल्हेवाट लावलेला खूनाचा गुन्हा गुन्हेशाखेकडील युनिट-५ विभागाने केला उघड**

पुणे शहरांत दिवसा व रात्रौचे वेळीचे घरफोडी चोरीचे प्रमाण वाढलेने मा.अपर पोलीस आयुक्त सो.गुन्हे,पुणे शहर श्री.प्रदीप देशपांडे, व मा.पोलीस उप-आयुक्त,गुन्हे,पुणे शहर श्री.पंकज डहाणे यांनी पुणे शहरांकडील यापुर्वीचे दिवसा व रात्रौचे वेळीचे घरफोडी चोरी करणारे रेकॉर्डवरील गुन्हेगारांबाबत माहिती अद्यायावत करुन त्यांचेवर लक्ष ठेवून माहिती काढून ते क्रियाशील असल्यांस त्यांचेवर कारवाई करणेबाबत आदेशित केलेले होते. त्यावरुन यापुर्वी सन २०१४ मध्ये 'गुन्हेशाखेने अटक करुन वाहन चोरी व दिवसा व रात्रौचे वेळीचे घरफोडी चोरीचे एकूण २३ गुन्हे उघडकीस आणलेले रेकॉर्डवरील गुन्हेगार नामेः-१) अजय डॅनियल गिल,वय २३ मूळ रा.मु.पो.नकोदर,जि.जालंदर (पंजाब) सध्या रा.हॉयलॉड खडी मशिन चौक समोर,कोंढवा बुाक,हवेली पुणे २) सॅमसन ऊर्फ बॉबी अॅन्थोनी ब्रुक्स,वय २६ वर्षे, मूळ रा.शाहुनगर,चारभिंती पाठीमागे,शिव कॉलनी सातारा, सध्या रा.दत्तवाडी आकुर्डी मिरगेचाळ,घर नं.१,पुणे ३) पांडुरंग विठठ्ल जगताप,वय ३४ वर्षे मूळ रा.मु.पो.करारी,माळवाडी बारामती,पुणे सध्या रा.शिवकृपा कॉलनी,घर नं.१,त्रिवेणीनगर,निगडी,पुणे ४) सर्फराज ईस्माईल सेफी/शेख वय २९ वर्षे सध्या रा.जिवलग सोसा,निगडी ओटा स्किम,पुणे,मूळ रा.मु.पो.केराभरा, गाझीयाबाद,हाजी रमजान हॉटेल जवळ,उत्तरप्रदेश ५) रिटा ऊर्फ मॅग्डलीन डेंन्झील डिसोझा, वय ४८ वर्षे, मूळ रा.सिध्देश्वर पेठ,खिस्त सेवा मंदिराजवळ,सोलापूर सध्या-महालक्ष्मी विहार सोसा,प्लॅट नं.१५,उंड्री,पुणे व त्यावेळी त्यांचेकडून उघडकीस आलेले एकूण २३ गुन्हयांतील त्यांचा फरारी साथीदार नामेः-हरप्रितसिंग तेजासिंग गिल ऊर्फ हरप्रितसिंग जग्गासिंग निज्जर हा अद्यापपर्यंत कोठेही अटक झालेला नव्हता व फरारी होता.

वरील सर्व आरोपी जामीनांवर बाहेरच असलेने .गुन्हेशाखेकडील युनिट-५ कडील प्रभारी अधिकारी श्री.दत्ता चव्हाण यांनी व त्यांचेकडील इतर पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी वरील रेकॉर्डवरील आरोपीची माहिती काढून ते खात्रीशीर शहर आणि परिसरांत घरफोडी चो-यां करत असलेचे संशय व्यक्त करुन त्यांना त्वरीत माहिती काढून अटक करणेबाबत आदेशित केले होते.त्याअनुषंगाने युनिट-५ कडील अधिकारी व कर्मचारी यांनी आरोपी नामेः-१) अजय डॅनियल गिल, २) सुमित सतिश मुदलियार, ३) रिटा ऊर्फ मॅग्डलीन डेंझील डिसुझा यांना चौकशी करतां ताब्यांत घेतले असतां त्यांनी हडपसर पो.स्टे.गुन्हा रजि.नं.७४९/२०१७ भा.दं.वि.क.४५४,४५७,३८०,३४ हा गुन्हा केलेचे कबुल केलेने त्यांना सदर गुन्हयांत दि.२०/०८/२०१७ रोजी अटक करणेत आलेली होती.सदर गुन्हयांचा तपास करीत असतांना नमूद आरोपी यांचा साथीदार नामेः-हरप्रितसिंग तेजासिंग गिल ऊर्फ हरप्रितसिंग जग्गासिंग निज्जर याचेबाबत आरोपी अनु क्र.१ अजय गिल याचेकडे चौकशी करीत असतांना तो घाबरुन जावून प्रश्नांना उत्तरे देवू लागलेने त्यांस विश्वांसात घेवून चौकशी केली असतां त्याने आपले साथीदार १) सुमित सतिश मुदलियार, २) रिटा ऊर्फ मॅग्डलीन डेंझील डिसुझा ३) सर्फराज ईस्माईल शेख ऊर्फ सैफी ४) नेल्सन सुरेश गायकवाड याचे मदतीने रिटाचे सांगणेप्रमाणे कट रचून हरप्रितसिंग निज्जर याचा खून केल्याचे व त्याचे मयत बॉडीची कात्रज घाटांतील दरीत फेकून देवून विल्हेवाट लावलेचे कबुल केले.

त्याने दिलेले माहितीवरुन अटक आरोपींना वेगवेगळे करुन त्यांचेकडे चौकशी केली असतां त्यांनी सर्वांनी गुन्हयांची कबुली दिलेली आहे.त्यावरुन आरोपी अजय गिल याचे भारतीय पुरावा कायदा क.२७ प्रमाणे केलेल्यां निवेदन व निवेदनांप्रमाणे मयत हरप्रितसिंग निज्जर याची डेडबॉडी ज्या ठिकाणावर टाकली होती. त्या ठिकाणांवरुन दोन शासकिय पंचासमक्ष व वन अधिकारी,कर्मचारी,गिर्यारोहक साक्षिदार यांचेसमक्ष मानवी

कवटी हस्तगत करणेत आली आहे.वैद्यकिय अधिकारी यांचे अभिप्रायांप्रमाणे ती कवटी मानवी पुरुष जातीचे असल्याचे निष्पन्न झालेले आहे. त्यावरुन आरोपींनी दिलेली कबुली ही सत्य असलेची खात्री झाली.

सदरबाबत भारती विद्यापीठ पोलीस स्टेशनच्या अभिलेख चेक केला असतां अकस्मात मयत अथवा खुनांचा गुन्हा दाखल नसलेने सदरची बॉडी गुन्हा घडला त्याकाळी फेकल्यानंतर कोणाचेही नजरेस आली नसलेची खात्री झाली. करिता युवराज नांद्रे,सहा.पोलीस निरिक्षक यांचे फिर्यादीवरुन कोंढवा पो.स्टे.गुन्हा रजि.नं.३४१/२०१७ भा.दं.वि.क.३०२,२०१,१२०(ब),३४ प्रमाणे गुन्हा दाखल करणेत आलेला असून सदर गुन्हयाचा तपास युनिट-५ चे प्रभारी अधिकारी दत्ता चव्हाण हे करीत आहेत.

**<u>गुन्हा कसा घडला याबाबतची हकीकत खालीलप्रमाणे :-</u>**

तपासांत निष्पन्न झालेली हकीकत अशी की,मयत हरप्रितसिंग निज्जर याची आई दिपासिंग निज्जर ही मयत याचे वडीलांबरोबर भांडण करुन सन २००० साली पुणे महाराष्ट्र येथे पंजाब वरुन तिचे बहिणीकडे पळून आली होती.त्यांनतर तिची आरोपी रिटा डिसुझा हिचेबरोबर ओळख झालेवर रिटाने तिस स्वतःचे एस.टी.डी.बुथवर व रहाते घरी कामास ठेवले व हरप्रितसिंग यांस एस.टी.डी.बुथ संभाळणेस सांगितले. काही कालावधीनंतर हरप्रितसिंगची आई वेश्या व्यवसाय करु लागली.व हरप्रितसिंग काही वाहन चोरी व घरफोडी करणारे गुन्हेगारांचे संगतीने गुन्हे करु लागला. मयत हरप्रितसिंग याची आई वेश्या व्यवसाय करीत असतांना शहा नावाचे व्यापा-यांचे सानिघ्यात आलेने त्याने तिस टिंगरेनगर,विश्रांतवाडी,पुणे येथे रखेल म्हणून ठेवली. व हरप्रितसिंग हा सतत रिटा डिसुझा हिचे सानिध्यांत राहिला. सन २०१६ साली मयत हरप्रितसिंग याची आई दिपासिंग ही कर्करोगाने मरण पावली आहे.

रिटा डिसुझा हिचे पती डेंझील डिसुझा हा मस्कत ओमान येथे नोकरीनिमित्त बाहेर रहावयांस होता. रिटांस त्याचेपासून दोन मुली व दोन मुले असा परिवार होता. पती सतत परदेशी असलेने रिटा ३८ वर्षाची असतांना सन २००७ साली ती मयत हरप्रितसिंग याचेबरोबर शारिरिक संबंध ठेवू लागली. व सदरची हकीकत स्वतःचे पतीस सांगून हरप्रितसिंगची रखेल बनली. मयत हरप्रितसिंग तिचे सोबत राहू लागला व चो-यां केलेले ऐवज व रक्कम तिचेकडे ठेवू लागला. कालांतराने रिटाच्या मुली या मयत हरप्रितसिंगचे वयाशी मिळत्या जुळत्या असलेने मयत हरप्रितसिंग त्यांचेवर जबरदस्ती व अतिप्रसंग करणेचा प्रयत्न करु लागला हे रिटाला मंजूर नव्हते.तिने विरोध केल्यावर तिस मारहाण करणे तसेच रिटाची छोटी मुलगी डायना ऊर्फ शरल हिस पळवून नेणेची अधूनमधून धमकी देणे,थोरली मुलगी जेनिफर हिचा खून करण्याची धमकी देणे,तसेच रिटास तू म्हतारी झाली आहे तुझ्यांत मजा येत नाही असे सतत टोकणे,त्यामुळे रिटा मयत हरप्रिंतसिंगच्या अत्याचाराला कंटाळलेली होती. त्यामुळे तिने मयत हरप्रितसिंग याला कुठल्याही परिस्थितीत कायमचा संपवून टाकणेचा व त्याचेपासून मुक्ती करुन घेण्याचा प्लॅन चालू केला. त्यात तिने प्रथम मयत हरप्रितसिंगचा गाववाला आरोपी नामेः-अजय सिंग गिल यांस तो जेलमध्ये असतांना लेखी पत्र पाठवून मयत हरप्रितसिंग याने तुंझ्या गावी सर्व नातेवाईकांना तु मोठा चोर झाला असून अनेक चो-यांचे गुन्हयांमध्ये तु जेलमध्ये आहेस अशी बदनामी केल्याची कळवून त्यांस मयत हरप्रितसिंग बद्यल मनांत द्वेष निर्माण करुन दिला होता. नंतर काही दिवस ती अजय गिल याला जेलमध्ये भेटावयांस जात होती.

कालांतराने अजय गिल हा जामीनांवर जेलमधून सुटलेनंतर रिटाने मयत हरप्रितसिंग याचा खून करणेचा कट अजय गिल यांस समजावून सांगितला व त्यासाठी पैसे खर्च करणेची तयारी दर्शविली. व साथीदार गोळा करणेस सांगितले होते. त्यावरुन अजय गिल याने रिटाचे सांगणेप्रमाणे आरोपी नामेः-१) सर्फराज ईस्माईल शेख ऊर्फ सैफी २) सुमित मुदलियार (ड्रायव्हर) यांना कटांत सामील केले. अजय गिल यांस २५,०००/- रुपये,सर्फराज शेख ऊर्फ सैफी यांस ५०,०००/- रुपये व सुमित मुदलियार यांस २०,०००/- रुपये सुपारी देणेचे

रिटाने ठरविले. ठरलेल्यां कटांप्रमाणे रिटाने पुर्वी राहत असलेले औंध,पुणे येथील खोली सोडून पुणे बाहेर एकांतात नवीन बांधकाम झालेल्यां बिल्डीगमध्ये महालक्ष्मी विहार,फ्लॅट नं.१५,उंड्री,पुणे-६० येथे नवीन भाडयाचे घर घेवून मयत हरप्रितसिंग व त्याचेपासून झालेले सॅबस्टीन ऊर्फ सनी ६ वर्ष यांचेसह रहावयांस सुरुवात केली दि.२७/०४/२०१४ रोजी रात्रौ रिटाची मयत आई हिचा जन्मदिवस साजरा करणेचे निमित्ताने पार्टीचे आयोजन केले. रिटाने सदर पार्टीसाठी आपला भाऊ नेल्सन गायकवाड यांसही बोलावून धेतले. व प्लॅन प्रमाणे मयत हरप्रितसिंग यांस भरपूर दारु पाजली दि.२८/०४/२०१४ पहाटे ०४.००वा.चे दरम्यांन मयत हरप्रितसिंग गाढ झोपला आहे व त्यांस शुध्द नाही याची खात्री करुन आरोपी अजय गिल,सुमित मुदलियार,सर्फराज सैफी यांस बोलावून घेतले. व बेडरुममध्येच सर्वांनी मिळून कटावणी व धारदार हत्याराने मयत हरप्रितसिंग यांस जिवे ठार मारले. पहाट झाली असल्याने दिवसभर मयत बॉडी बेडरुममध्ये बेडसिटमध्ये गुंडाळून ठेवली. दिवसा अजय गिल व सुमित मुदलियार यांनी मयत बॉडीची विल्हेवाट लावणेसाठी कात्रज घाटांतील दरीचे ठिकाण पाहून आले. व रात्रौ ११.००वा.चे दरम्यांन रिटाचे फोर्ड आयकॉन कारमधून मयत हरप्रितसिंग याचा मृतदेह कात्रज घाटांत दरी फेकून दिला..

वरील अटक आरोपी १) अजय डॅनियल गिल, याचेविरुध्द पुणे शहरात दरोडयाची तयारी,वाहन चोरी व दिवसां रात्रौचे घरफोडी चोरीचे एकूण १८ गुन्हे आहेत.

अनु क्र.२) सुमित सतिश मुदलियार, वय २७ वर्षे,रा.श्री राम निवास,प्लॉट नं.१८,स.नं.१६,आंबेगाव पठार, कात्रज,पुणे यांचेविरुध्द घरफोडी चोरीचा ०१ गुन्हा दाखल आहेत.

अनु क्र.३) रिटा ऊर्फ मॅग्डलीन डेंझील डिसुझा ,वय ४८ वर्षे हिचेविरुध्द पुणे शहरांत वाहन चोरी व दिवसां रात्रौचे घरफोडी व आपले साथीदारांनी गुन्हे केलेनंतर मालाची विल्हेवाट लावणेकामीचे एकूण १६ गुन्हे असून ते पुणे शहर पोलीसांचे रेकॉर्डवरील गुन्हेगार आहेत.

निष्पन्न आरोपी सर्फराज ईस्माईल शेख ऊर्फ सैफी ,वाहन चोरी व दिवसां रात्रौचे घरफोडी चोरीचे एकूण १८ गुन्हे आहेत.

तसेच मयत इसम नामेः-हरप्रितसिंग तेजासिंग निज्जर,वय २७ वर्षे, हा देखील पुणे शहर पोलीसांचे रेकॉर्डवरील गुन्हेगार असून त्याचेवर एकूण २३ गुन्हे दाखल आहेत.

सदरच्या गुन्हयांमध्ये कोणत्याही प्रकारचा पुरावा नसतांना तसेच मयत बॉडी देखील मिळालेली नसतांना गेली साडे तीन वर्षापुर्वी झालेला खुनाचा गुन्हा मा.अपर पोलीस आयुक्त,गुन्हे,पुणे शहर श्री.प्रदीप देशपांडे, मा.पोलीस उप-आयुक्त,गुन्हे,पुणे शहर श्री.पंकज डहाणे,मा.सहा.पोलीस आयुक्त गुन्हे-२ पुणे शहर,श्री.संजय निकम यांचे मार्गदर्शनांखाली युनिट-५ चे प्रभारी अधिकारी श्री.दत्ता चव्हाण, सपो.निरी,युवराज नांद्रे, स.पो.फौज.लक्ष्मण शिंदे,पो.हवा.संतोष मोहिते.माणिक पवार,प्रविण शिंदे,सचिन घोलप,प्रदीप सुर्वे ,सिध्दराम कोळी,राजेश रणसिंग,पो.ना.अमजद पठाण,.महेश वाघमारे,प्रविण काळभोर,प्रमोद घाडगे,गणेश बाजारे, पो.शि.नामदेव आंगज,.अंकुश जोगदंडे,चा.पो.शि.संजय दळवी व महिला पो.शि.गितांजली जाधव व स्नेहल जाधव यांनी उघडकीस आणलेला आहे.तसेच सदर गुन्हा उघडकीस आणणेकामी निगडी पो.स्टे.कडील पो.हवा.संदीप पाटील व चतुश्रृंगी पो.स्टे.कडील पो.शि.तेजस चोपडे यांनी मदत केलेली आहे.

**सदरच्या गुन्हयांचा तपास वरिष्ठ पोलीस निरिक्षक श्री.दत्ता चव्हाण हे करीत आहेत.**